**समरी फौजदारी खटला क्र. ५५/२०१७ मधील**
**निशाणी क्र. ८८ ते ९३ वरील एकत्रित आदेश**
(वंदना नाईक वि. परीक्षित मांजरेकर)
सीएनआरनं.एमएचएसआय०६–००००९६–२०१७

१. प्रस्तुतचे निशाणी क्र. ८८ ते ९२ लगत दाखल करणेत आलेले अर्ज हे आरोपीतर्फे दाखल करणेत आलेले आहेत. आरोपीने निशाणी ८८, ८९ लगत दाखल केलेले अर्ज हे त्यास सदर प्रकरणातील धनादेश क्र.४१३३१७ व ४१३३१८ प्रत्येकी रक्कम रुपये ३०,०००/– याप्रमाणे एकूण रक्कम रुपये ६०,०००/– एक रकमी न्यायालयात भरणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केलेले आहे. तसेच निशाणी ९० ते ९३ लगत दाखल केलेले अर्ज हे धनादेश क्र. ४१३३१७ व ४१३३१८ प्रत्येकी रक्कम रुपये ३०,०००/– प्रमाणे एकूण रक्कम रुपये ६०,०००/– न्यायालयात जमा करणेस परवानगी मिळणेबाबत व सदरचे प्रकरण लोकअदालत अथवा मेडीएशनकडे ठेवून तडजोड करणेस संधी मिळणेबाबत दाखल केलेले आहे.

२. आरोपीतर्फे दाखल करणेत आलेल्या सदर सर्व अर्जास फिर्यादीने म्हणणे दाखल केलेले असून, आरोपीच्या अर्जातील कथनांचा स्पष्टपणे इन्कार केलेला आहे. फिर्यादीने आरोपी हा सदरचे प्रकरण प्रलंबित ठेवणेच्या उद्देशाने सदरचे अर्ज दाखल करत आहे असा आक्षेप नोंदवून फिर्यादीने सदरचे अर्ज नामंजूर करणेबाबत विनंती केलेली आहे.

३. फिर्यादीतर्फे विधिज्ञ श्री.एस.एम.सावंत व आरोपीचा युक्तीवाद ऐकला.

४. फिर्यादीतर्फे विधिज्ञ यांनी युक्तीवादादरम्यान फिर्यादी ही आरोपी जमा करु इच्छित असलेली रक्कम स्विकारुन तडजोड करणेस तयार नाही असे कथन केले. याउलट, आरोपीने तो धनादेशाची रक्कम न्यायालयात जमा करणेस तयार आहे असे कथन केले. त्यामुळे फिर्यादी व आरोपी यांचे दरम्यान तडजोड होणेच्या उद्देशाने मदत होणेकरिता दि.३०/०८/२०२३ रोजी निशाणी १ लगत आदेश पारीत करुन फिर्यादी व आरोपी यांनी मा.ना.सर्वोच्च न्यायालय यांनी ***Meters and Instruments Private Ltd.and another V. Kanchan Mehata (2018) 1 SCC 560*** व ***Damodar S. Prabhu V. Sayyad Babalal MANU/SC/0319/2010*** या न्यायानिर्णयाकामी पारीत केलेल्या निर्देशांबाबत युक्तीवाद करणेकरिता आदेशीत केले.

५. निशाणी १ लगत पारीत केलेल्या आदेशानुसार फिर्यादीतर्फे विधिज्ञ यांनी युक्तीवाद केला व युक्तीवादादरम्यान आरोपी हा धनादेशाच्या दुप्पट रक्कम फिर्यादीस देणेस तयार झालेस तडजोड करणेस हरकत नसलेचे कथन केले. याउलट, आरोपीने तो केवळ न्यायालयात धनादेशाची एकूण रक्कम देणेस तयार असल्याचे कथन केले.

६. फिर्यादी व आरोपी यांना पुरेशी संधी देवून देखील त्यांचेदरम्यान तडजोडीबाबत कोणतेही प्रयत्न झाल्याचे दिसून येत नाहीत. आरोपी हा धनादेशाची रक्कम न्यायालयात जमा करणेस तयार आहे असे कथन करत आहे. परंतु, फिर्यादी ही त्यांस तयार नसलेचे स्पष्ट करत आहे. मा.ना.सर्वोच्च न्यायालय यांनी ***JIK Industries Ltd. V.Amarlal V.Jumani (2012) 3 SCC 255*** या न्यायनिर्णयामध्ये भारतीय चलन दस्ताऐवज कायदा कलम १३८ प्रमाणे दाखल झालेल्या प्रकरणास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३२० मधील तरतुद लागू होत असून सदर गुन्हयाअंतर्गत दाखल होणारी प्रकरणे तडजोड करतेवेळेस फिर्यादी हिची सहमती विचारात घेणे आवश्यक आहे असे स्पष्ट केलेले आहे.

७. या न्यायालयासमोर प्रलंबित असणाऱ्या प्रकरणामध्ये फिर्यादी हिची तडजोड करणेस तयारी नसलेचे स्पष्ट केलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये आरोपीस न्यायालयात धनादेशाची रक्कम जमा करणेस परवानगी देणे न्यायोचित वाटत नाही. फिर्यादी हिचे सहमतीखेरीज सदर प्रकरणी तडजोड करणेबाबतचे अथवा त्याअनुषंगे अन्य कोणतेही आदेश पारीत करणे न्यायोचित नाही. सबब, आरोपीचे वतीने दाखल करणेत आलेले सदर अर्ज मंजूर करता येण्याजोगे नाही. या कारणाकरिता मी न्यायाचे कारणास्तव मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

–::– **आदेश** –::–

१. सर्व अर्ज नामंजूर करणेत येत आहेत.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/–
[श्रीमती दुर्गा प्र.पुजारी ]
न्यायदंडाधिकारी वर्ग–१, सावंतवाडी.

दिनांकः २३/०१/२०२४.